मुद्रित पृष्ठों की संख्या : 6 **BMRLA–135**

# बी. ए. (सामान्य) (बी. ए. जी.)

## सत्रांत परीक्षा

## जून, 2025

## बी.एम.आर.एल.ए.–135 : आधुनिक भारतीय भाषा—मराठी

*समय : 3 घण्टे* *अधिकतम अंक : 100*

***नोट :*** *सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहेत.*

1. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा : 20

   (अ) विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगती

   (ब) अकस्मात पडलेला पाऊस

   (क) शिक्षण–विकासाचा पाया

   (ड) एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ

2. पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा : 16

   (अ) "वैराग्य हेच वैभव", असे संत तुकाराम का म्हणतात ?

(ब) भूपाळीतून पहाटेचे वर्णन करा.

(क) 'तुतारी' कविता अन्याय, अत्याचारा विरुद्ध बंड कसे करते ?

(ड) 'नव्या मनूतिल गिरिधर पुतळ्याचे चित्र गोचर करा.

3. पुढीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे लिहा : 12

(अ) कातरवेळी अक्काची झालेली मन:स्थिती वर्णन करा.

(ब) वळीव कथेतील तात्याचे व्यक्तीमत्व विशेष स्पष्ट करा.

(क) प्रह्लाद चेलमा तून दलित समाजाचे प्रतिनिधित्व कसे करतो ?

(ड) पिपंळचा ढापा विजेने मोडून पडला, प्रसंग वर्णन करा.

4. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर विस्तृत टीप लिहा :12

(अ) पु. ल. देशपांडेना पौंड या विषयी शंका आल्या.

(ब) अक्षर वाङ्मय राष्ट्राची संपत्ती आहे.

(क) भाऊरावांनी शाहू छत्रपतीचे कार्य पुढे नेले.

(ड) स्त्रीविषयक पारंपारिक व आधुनिक दृष्टिकोण

5. शब्दयोगी अव्यय व केवल प्रयोगी अव्यय फरक स्पष्ट करा. 10

**किंवा**

पुढीलपैकी कोणत्याही **एका** कल्पनेचा विस्तार करा :

(अ) पाचा मुखी परमेश्वर

(ब) खान तशी माती

(क) कावळ्याच्या शापाने गाई मरत नसतात

(ड) दुरुन डोंगर साजरे

6. पुढीलपैकी कोणत्याही **तीन** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा: 6

(अ) आखाड्यात उतरणे

(ब) इंगा दाखवणे

(क) उंटावरून शेळया राखणे

(ड) उरात धडकी भरणे

(इ) एकमत होणे

**किंवा**

पुढीलपैकी कोणत्याही **तीन** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(अ) गुरु तसा चेला

(ब) पोटात एक ओठात एक

(क) शेरास सव्वाशेर

(ड) पेरावे तसे उगवते

(इ) खाईन तर तुपाशी नाही तर उपाशी

7. पुढीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर लिहा : 8

(अ) अतिपावसामुळे कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते ?

(ब) स्त्रीची बदलती भूमिका स्पष्ट करा.

(क) विद्यार्थ्यांना स्पर्धायुगात कोणती आह्वाने आहेत ?

(ड) विज्ञानामुळे मानवाने शिखर गाठले ?

8. पुढील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 8

I am a book, the beloved of educated masses. The illiterates cannot dare touch me. They can simply look at me and long for my sweet company. I am the constant companion of students and researchers, philosophers and professors, teachers and readers. I enjoy the circle of elites who profit by me. It is through me people win literary prizes and Nobel prizes. It is I who am behind the great

success of men, women and children. For me age is no bar, caste is no bar. I make no distinction between man and man on the basis of colour and creed. I know no particular religion.

9. पुढील उताऱ्याचा सारांश लिहा : 8

''आपल्यात्या थोडीफार शेती असती, तर शेतात काम करण्यात तरी वेळ गेला असता. धावडीची मुळातच बरड असलेली शेती; पण आता शेतकऱ्यांनी खपून दगडगोटूयाविरहित केली होती. पावसाने जमिनीची धूप जाऊन कस कमी होऊ नये, म्हणून चारी बाजूने ताली टाकल्या होत्या. बागेतील फुलझाडांचे चौक उठून दिसावेत त्याप्रमाणे धावडीची शेली दिसत होती. शेतीच्या मालकापैक्षा आपल्याच गडी माणसांनी त्याच्या शेतात खपून हे सोन्याचे पीक करून दिल्याबद्दल मधूचे मन त्यांच्या अफाट श्रमामुळे भरून येत होते. आपल्या तीन वाड्यात कुणाकडे ही शेती नाही, का ? आपला समाज दरिद्र का राहिला ? आपल्या माणसांनी जमिनी साठी कधी प्रयत्न केला नाही का ?

आपल्या माणसांनी नुस्ती पैदासच केली ? आपल्या माणसांना हाताशिवाय दुसर काम नाही. दुसऱ्या समाजातील लोकांना हातपाय न हालवता ही पिढ्यान पिढ्या जन्माची सोय करून ठेवली. या बाबतीत ब्राह्मण मोठे चतुर म्हणावे लागतीत! पोथी पुराण–पंचाग सांगंण, याप्रकारे बारा महिने पुजापाठ करून दक्षिणा उकडणारा व खंडणी वसूल करणार.'' गावी आल्यास असेच अनेक विचार मधूच्या डोक्यात सदोदीत डोकावत असत.

× × × × ×